# प्रेसनोट

## वाहनचोरी विरोधी पथक, गुन्हेशाखा, पुणे शहर कडून चार हजार आठशे बावन्न कि.लो. भेसळयुक्त खव्यावर कारवाई.

दिनांक २१/०९/२०१८ रोजी वाहनचोरी विरोधी पथक, गुन्हे शाखा, पुणे शहर चे पथक गणेशोत्सव निमित्त स्वारगेट पोलीस स्टेशनचे हद्दीत कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने गस्त करीत असताना पथकातील **पोलीस कर्मचारी शंकर संपते** यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, पोर्णिमा टॉवर, स्वारगेट, पुणे या ठिकाणी एका खाजगी प्रवासी वाहतुक करणा-या बसमध्ये भेसळयुक्त खवा लपवून तो बाजारात विक्री करण्या करीता येणार असल्याची माहीती मिळाली. त्या प्रमाणे वाहनचोरी विरोधी पथक, गुन्हे शाखेचे प्रभारी पो.निरी. श्री. दिपक लगड यांनी सदरची बातमी मा. वरिष्ठांना कळवून तसेच सदर माहीती ही अन्न व औषध प्रशासन विभागातील अधिका-यांना कळवून त्यांचे मदतीने पोर्णिमा टॉवर, स्वारगेट, पुणे या ठिकाणी सापळा लावून आज सकाळी १०:०० वा.चे सुमारास निता ट्रॅव्हल्स, स्पीड लिंक गाडी नं.जी.जे./०१/डी.वाय./००४५ ही झडती घेता सदर बसमध्ये व बसच्या टफावर प्रवासी ऐवजी चार हजार आठशे बावन्न कि.लो. भेसळयुक्त खवा मिळून आला. सदर खव्याचा सॅम्पल अन्न व औषध प्रशासन विभागातील अधिका-यांनी चाचणी करीता काढून घेऊन वरील खवा जप्त करण्यात आला असून सदर खव्याची बेकायदेशीर वाहतुक करणारे चालक इसम १) हिंमतसिंग गोपालसिंग राठोड, वय-४५, रा.अहमदाबाद, गुजरात व इतर ०२ इसमां विरुध्द अन्न व औषध प्रशासन विभागातील अधिका-यांनी कारवाई केलेली असुन सदरची निता ट्रॅव्हल्स, स्पीड लिंक गाडी नं.जी.जे./०१/डी.वाय./००४५ ही ताब्यात घेतलेली आहे.

गणेशोत्सवाचे निमित्ताने व्यापा-यांचे मागणीवरुन सदरचा भेसळयुक्त खव्या सारखा पदार्थ हा पुणे शहर, नागपूर व हैद्राबाद या ठिकाणी विक्री करीता आणले असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

सदरची कारवाई ही सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-२, श्री. भानुप्रताप बर्गे यांनी दिलेल्या सुचनां व मार्गदर्शनाप्रमाणे वाहनचोरी विरोधी पथक, गुन्हेशाखेचे पोलीस निरीक्षक, दिपक लगड यांचे नेतृत्वाखाली कर्मचारी सुनिल पवार, शंकर संपते, जितेंद्र तुपे, मोहन येलपले तसेच अन्न व औषध प्रशासन विभागातील अधिकारी श्री.एस.पी.शिंदे, सहाय्यक आयुक्त, श्री.पी.टी.गुंजाळ आणि श्रीमती म्हस्के यांनी सहभाग घेतला आहे.